सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहिर सुचना**

सिडको महामंडळाने दि.12.04.2023 रोजी विविध पदांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. सदर जाहिरातीमधील कार्यकारी अभियंता (स्थापत्य), सहाय्यक परिवहन अभियंता व सहाय्यक विधी अधिकारी या संवर्गातील काही पदे महिलांसाठी आरक्षित करण्यात आली होती. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक-महिआ 2023/ प्र.क्र.123/ कार्या-2, दिनांक-04 मे 2023 अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी अराखीव महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

अन्वये, वर नमूद पदांसाठी ज्या महिलांना नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्र नसल्याकारणाने महिलांसाठी आरक्षित असलेल्या 30% आरक्षणाचा लाभ घेता आलेला नाही, अशा अराखीव प्रवर्गातील तसेच मागास प्रवर्गातील महिलांचा महिला व बाल विकास विभाागाच्या दि.04.05.2023 रोजीच्या शासन निर्णय क्रमांक- महिआ 2023/प्र.क्र.123/कार्या-2 नुसार खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित केलेल्या पदांकरीता विचार केला जाईल.

वर नमूद शासन निर्णयाच्या मुद्दा क्र. 04 मध्ये नमूद केल्यानुसार, “अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन- क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील”.

**व्यवस्थापक (कार्मिक)**
**सिडको**